ePaper
निवडणूक सुरू पण प्रचारसभा न घेण्याचा उमा भारती यांचा निर्णय



| वर्ष - 7 | अंक - 184 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- द.आफ्रिकेचा ५ गडी राखून विजय
- आदित्य व अनन्याच्या डेटिंगच्या चर्चा
- मोदी दिवसातून दोनदा सूट बदलतात!
- तुम्हाला हेच शिकवलं आहे का?

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 11 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# नदी प्रदूषणाबाबत प्रशासन 'अलर्ट'!

## » खासगी कंपनीच्या मालकावर गुन्हा : ताथवडे भागात केले सर्वेक्षण

।पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**रसायनयुक्त पाणी महापालिकेच्या जलनि:सारण (PIMPRI) नलिकेत सोडणाऱ्या ताथवडे येथील 24 क्लेन (मेसर्स क्लेनफॅब सर्विसेस एल. एल. पी) या ड्रायक्लिनर्सच्या कंपनीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



केजूदेवी बंधारा थेरगाव येथे मागील काही दिवसांपासून पवना नदीमध्ये पांढऱ्या रंगाचा फेस तयार होवून दुर्गंधी येत आहे. या अनुषंगाने पर्यावरण व जलनि:सारण विभागाच्या वतीने ताथवडे भागात सर्वेक्षण केले.

या दरम्यान ताथवडे येथील 24 क्लेन (मेसर्स क्लेनफॅब सर्विसेस एल. एल. पी) या ड्रायक्लिनर्सच्या कंपनीने ड्रायक्लिन करण्यासाठी वापरण्यात येणारे रसायनयुक्त पाणी प्रक्रिया न करता महापालिकेच्या जलनि:सारण नलिकेस विना परवाना जोडले होते. हे सायनयुक्त पाणी हे काळपट निळसर व फेसयुक्त होते. ड्रायक्लिन कंपनीच्या मालकावर वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई जलनि:सारण व पर्यावरण विभागाचे अधिकारी तसेच आरोग्य निरिक्षक अमोल गोरखे, गोरक्षनाथ करपे, कनिष्ठ अभियंता संदिप पाडवी, सचिन मगर यांच्या वतीने करण्यात आली.यापुढेही अशी कारवाई चालू राहणार असून अशा प्रकारच्या नदी प्रदूषण करणा-या व्यक्ती आढळून आल्यास त्यांचे विरूद्ध कारवाई करण्यात येणार असून नागरिकांनी देखील असे आढळून आल्यास महापालिकेस त्वरित कळवावे असे आवाहन करण्यात आले आहे.

### नदी प्रदूषण करणाऱ्यांची गय नकोच...

**» महापालिका प्रशासनाचे नदी पात्रात रसायनमिश्रीत पाणी सोडणाऱ्यांवर धडक कारवाई करावी. संबंधित कंपन्यांमधून बाहेर पडणारे पाणी आणि त्यामुळे होणारी पर्यावरणाची हानी याचे दूरगामी परिणाम शहरवासीयांवर होणार आहेत. त्यामुळे प्रदूषणाला खतपाणी घालणाऱ्या कंपन्यांचा बंदोबस्त करावा. नदी सुधार प्रकल्प हाती घेवून पवना व इंद्रायणी नद्यांचे पुनरुज्जीवन करावे, अशी मागणी पर्यावरण प्रेमी नागरिकांकडून होत आहे.**

# पात्र उमेदवारांना महिनाअखेर नियुक्ती!

## » प्रशासनाची तयारी : महिनाअखेरीस 368 उमेदवारांना विविध पदांवर रुजू करून घेण्यात येणार

। पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**महापालिकेच्या वतीने घेण्यात आलेल्या नोकरभरती परीक्षेतील उत्तीर्ण उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. पात्र उमेदवारांची अंतिम यादी दिवाळीनंतर प्रसिद्ध केली जाणार असून, महिनाअखेरीस ३६८ उमेदवारांना विविध पदांवर रुजू करून घेण्यात येणार आहे. त्यामुळे महापालिकेचे मनुष्यबळ वाढणार आहे.**





महापालिकेच्या वेगवेगळ्या १५ पदांच्या ३६८ जागांसाठी मे महिन्यामध्ये तीन दिवस राज्यभरातील विविध केंद्रांवर ऑनलाइन परीक्षा घेण्यात आली. परीक्षेनंतर ११ पदांसाठीच्या ३५ जागांचा निकाल सात ऑगस्टला जाहीर झाला. त्यात अतिरिक्त कायदा सल्लागार, विधी अधिकारी, उपमुख्य अग्निशमन अधिकारी, विभागीय अग्निशमन अधिकारी, उद्यान निरीक्षक (वृक्ष), उद्यान निरीक्षक, हॉर्टिकल्चर सुपरवायझर, कोर्ट लिपीक, ॲनिमल किपर, समाजसेवक, आरोग्य निरीक्षक या पदांचा समावेश होता.

लिपीक, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (विद्युत), स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या चार पदांसाठी ३० हजार ५८१ जणांनी परीक्षा दिली होती. त्यांचा निकाल ३० ऑगस्टला जाहीर करण्यात आला.

आरक्षणानुसार पात्र उमेदवारांची कागदपत्रे तपासणीचे काम नुकतेच पूर्ण झाले आहे. सादर केलेली प्रमाणपत्रे शासकीय मान्यताप्राप्त संस्थेचे आहेत की नाही हे तपासणे सुरू आहे.

सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर समितीची मंजुरी घेऊन पात्र उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्यात येईल. त्यासाठी १५ दिवसांचा कालावधी लागणार आहे.

> "कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाल्यावर अंतिम पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर विविध पदांसाठी ३६८ जणांना महापालिकेत रुजू करून घेतले जाईल. ही प्रक्रिया नोव्हेंबरअखेरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.
>
> -विठ्ठल जोशी,
> उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका.

# सिकंदर शेख नवा महाराष्ट्र केसरी!

## » शिवराज राक्षेचा पराभव करत पटकवली चांदीची गदा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातल्या फुलगावमध्ये सुरु असलेल्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेचा निकाल हाती आला आहे. गतविजेत्या शिवराज राक्षेला आस्मान दाखवत सिकंदर शेखने महाराष्ट्र केसरी हा पुरस्कार जिंकला आहे. मानाची गदा उंचावत त्याने उपस्थितांना अभिवादन केलं आणि आपला विजय साजरा केला. सिकंदर शेख ६६ व्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेचा विजेता ठरला आहे.**



महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेची अंतिम फेरी ही महत्त्वाची होती. या फेरीत सिकंदरचे पारडे जड होते. मात्र शिवराज राक्षे त्याला आव्हान देईल असंही अनेकांना वाटत होतं. मात्र वेगवान आणि आक्रमक कुस्ती खेळणाऱ्या सिकंदरपुढे शिवराज राक्षेचा निभाव लागला नाही. लढत सुरु झाल्यानंतर झोळी डाव घेत शिवराजला उचलून खाली घेतले आणि चितपट करुन विजय मिळवला. माती विभागातून संदीप मोटेचा पराभव करुन सिकंदर शेखने अंतिम फेरी गाठली होती. तर गादी विभागातून हर्षद कोकाटेला पराभवाची धूळ चारत शिवराज राक्षे दुसऱ्यांदा महाराष्ट्र केसरीच्या अंतिम फेरीत धडकला होता. या दोघांमधली लढत अत्यंत चुरशीची झाली. या लढतीत शिवराज राक्षेचा पराभव करत सिकंदर शेखने मैदान मारलं आणि महाराष्ट्र केसरीच्या गदेवर आपलं नाव कोरलं. सिकंदर शेखचं मूळ गाव सोलापूर जिल्ह्यातलं मोहोळ आहे. त्याच्या घरात आजोबांपासून कुस्तीची परंपरा आहे. सिकंदरचे वडील रशिद शेखही पैलवानी करायचे. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत सिकंदर शेखने कुस्तीचे धडे गिरवले.

तसंच हा पठ्ठ्या आता महाराष्ट्र केसरी या कुस्तीतल्या मानाच्या पुरस्काराचा मानकरी ठरला आहे. २२ वर्षांचा सिकंदर शेख हा कोल्हापुरातल्या गंगावेश तालमीतला पैलवान आहे. लहान वयातच त्याने मातब्बर पैलवानांना चितपट केलं आहे. सिकंदरची घरची परिस्थिती हलाखीची होती. मात्र आई आणि वडील या दोघांनीही त्याला पैलवान होण्यासाठी प्रोत्साहन दिलं. २०१८ मध्ये मोहोळमध्ये सिकंदरने कुस्तीचा सराव सुरु केला होता. त्याच्या बरोबरीचे पैलवान त्यावेळी तालमीत नव्हते. त्यामुळे सिकंदरच्या वडिलांनी आणि वस्तादांनी कोल्हापुरातल्या गंगावेश तालमीत त्याला पाठवण्याचा निर्णय घेतला. कोल्हापुरातल्या गंगावेश तालमीत आल्यापासूनच त्याच्या पैलवानीला सुरुवात झाली. कुस्तीची पंढरी मानली जाणाऱ्या कोल्हापुरातल्या गंगावेश तालमीत मेहनत घेणाऱ्या सिकंदर शेखने अवघ्या २२ सेकंदात ६६ व्या महाराष्ट्र केसरीचा किताब पटकवला.अंतिम फेरीच्या लढतीत सिकंदर शेखने प्रतिस्पर्धी शिवराज राक्षेला २२ व्या सेकंदाला झोळी डावावर चितपट केले. माती विभागातून संदीप मोटेचा पराभव करुन सिकंदर शेखने अंतिम फेरी गाठली होती. तर गादी विभागातून हर्षद कोकाटेला पराभवाची धूळ चारत शिवराज राक्षे दुसऱ्यांदा महाराष्ट्र केसरीच्या अंतिम फेरीत धडकला होता. या दोघांमधली लढत अत्यंत चुरशीची झाली. या लढतीत शिवराज राक्षेचा पराभव करत सिकंदर शेखने मैदान मारलं आणि महाराष्ट्र केसरीच्या गदेवर आपलं नाव कोरलं.

### काय म्हणाला सिकंदर शेख?

» सिकंदर शेख आणि गतविजेता शिवराज राक्षे यांच्यात चुरशीचा सामना झाला. अवघ्या काही क्षणांमध्ये सिकंदर शेखरने शिवराज राक्षेला आस्मान दाखवलं आणि महाराष्ट्र केसरीची मानाची गदा तसंच महिंद्रा थार ही गाडी मिळवली. “माझ्या विजयाचं श्रेय माझे वडील आणि माझे कोच यांना जातं. मी मागचे सहा ते सात महिने कसून सराव केला. मला आता देशासाठी मेडल आणण्याची इच्छा आहे” असं सिकंदर शेखने म्हटलं आहे.

### काय घडलं 22 सेकंदात?

» अंतिम फेरीची लढत सुरु झाली. शिवराज राक्षे आणि सिकंदर शेख यांनी एकमेकांना आव्हान देण्यास सुरुवात केली. सुरुवात झाल्यापासूनच सिकंदर आक्रमक वेगाने खेळत होता. सिकंदरच्या वेगापुढे शिवराजचा निभाव लागला नाही. कारण २२ व्या सेकंदाला सिकंदरने झोळी डाव घेत शिवराजला धोबीपछाड केलं. चितपट करुन विजय मिळवला. कुस्तीचे हे २२ सेकंद उपस्थितांच्या डोळ्यांचं पारणं फेडणारे ठरले.

# अधिष्ठाता डॉ. ठाकूर यांची उचलबांगडी!

## » सरकारने ससूनचे डॉ. देवकाते यांचे केले निलंबन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ससून सर्वोपचार रुग्णालयातील कैदी पलायन प्रकरणात अधिष्ठाता डॉ.संजीव ठाकूर आणि अस्थिव्यंगोपचार विभागातील पथकप्रमुख डॉ.प्रवीण देवकाते यांच्यासह इतर अधिकारी दोषी आढळले आहेत. या प्रकरणी राज्य सरकारने डॉ.ठाकूर यांना पदमुक्त केले असून, डॉ.देवकाते यांना निलंबित केले आहे.**

ससून रुग्णालयातून अमली पदार्थ तस्करी प्रकरणाचा सूत्रधार ललित पाटील याने पलायन केल्याप्रकरणी राज्य सरकारने चार जणांची चौकशी समिती ११ ऑक्टोबरला नियुक्त केली होती. या समितीच्या अध्यक्षपदी वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाचे प्रभारी संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर होते. ही समिती १५ दिवसांत चौकशी करून सरकारला अहवाल सादर करणार होती. समितीचे अध्यक्ष डॉ. म्हैसेकर यांनी १५ दिवस संपताच तातडीने २७ ऑक्टोबरला चौकशी अहवाल वैद्यकीय शिक्षण आयुक्त राजीव निवतकर यांना सादर केला होता. हा अहवाल निवतकर यांच्याकडून वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव दिनेश वाघमारे यांच्याकडे पाठवला जाणार होता. वाघमारे हे परदेश दौऱ्यावर होते. ते परतल्यानंतर ३ नोव्हेंबरला




हा अहवाल त्यांच्यासमोर सादर करण्यात आला. नंतर वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ हे दौऱ्यावर होते. ते दौऱ्यावरून परतल्यानंतर त्यांच्याकडे अखेर ८ नोव्हेंबरला अहवाल सादर करण्यात आला. त्यानंतर शुक्रवारी राज्य सरकारने ससूनचे अधिष्ठाता डॉ.ठाकूर यांना पदमुक्त केले तर डॉ.देवकाते यांचे निलंबन केले. दरम्यान, ससूनचे अधिष्ठाता डॉ. ठाकूर यांची नियुक्ती उच्च न्यायालयाने शुक्रवारी रद्द केली. याप्रकरणी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने (मॅट) दिलेल्या आदेशाला डॉ. ठाकूर यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. उच्च न्यायालयाने ठाकूर यांच्या विरोधात निकाल दिल्याने तत्कालीन अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांच्या पुनर्नियुक्तीचा मार्ग खुला झाला आहे. ससून रुग्णालयातून अमली पदार्थ तस्करी प्रकरणाचा सूत्रधार ललित पाटील याने पलायन केल्याप्रकरणी राज्य सरकारने चार जणांची चौकशी समिती ११ ऑक्टोबरला नियुक्त केली होती. या समितीच्या अध्यक्षपदी वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाचे प्रभारी संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर होते. ही समिती १५ दिवसांत चौकशी करून सरकारला अहवाल सादर करणार होती. समितीचे अध्यक्ष डॉ. म्हैसेकर यांनी १५ दिवस संपताच तातडीने २७ ऑक्टोबरला चौकशी अहवाल वैद्यकीय शिक्षण आयुक्त राजीव निवतकर यांना सादर केला होता.

> “ पुण्यातील ससून सर्वोपचार रुग्णालय चौकशी समितीचा अहवाल शासनास सादर झाला. त्यामध्ये अधिष्ठाता डॉ.संजीव ठाकूर, अस्थिव्यंगोपचारशास्त्र पथकप्रमुख डॉ. प्रवीण देवकाते व इतर अधिकारी दोषी आढळले आहेत. त्यामुळे डॉ.ठाकूर यांना पदमुक्त तर डॉ.देवकाते यांचे निलंबन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.
>
> **–दिनेश वाघमारे,** सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग

# कामगार भवनची प्रतिक्षा!

## कार्यवाहीला गती मिळावी: लोकप्रतिनिधींचा कामगार मंत्र्यांकडे पाठपुरावा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मोरवाडी येथे साडे पाच एकरमध्ये कामगार भवन उभारण्यात येणार आहे. भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप, माजी उपमहापौर केशव घोळवे, आमदार उमा खापरे यांनी त्यासाठी पाठपुरावा केला आहे. नुकतीच कामगार मंत्री सुरेश खाडे यांच्या सोबत बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये कामगार भवन उभारून त्यामध्ये अद्ययावत सुविधा मिळाव्यात, यासाठी लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा केला आहे. त्यामुळे नियोजित कामगार भवनला आता गती मिळणार असल्याचे चित्र आहे.**



महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळांसाठी नेहरूनगर येथील अण्णासाहेब मगर मैदानावर 29 एकरची जागा आरक्षित करण्यात आली होती. या ठिकाणी कामगार भवन निर्माण केले जाणार होते. याद्वारे कामगारांसाठी कल्याणकारी योजना, अभ्यासिका, खेळाचे मैदान, जलतरण तलाव, म्युझियम आदी सुविधा देण्याचे नियोजन होते. मात्र तत्कालीन महापालिकेच्या राज्यकर्त्यांनी भूखंड ताब्यात दिला नाही. त्यामुळे कामगार कल्याण मंडळाचे स्वतंत्र कार्यालय होऊ शकले नाही.

कामगार भवन आणि कार्यालय सुरू करण्यासाठी भारती चव्हाण यांच्यासह इतर कामगार संघटना लढा देत होत्या. मात्र महापालिका प्रशासन त्याला सकारात्मक प्रतिसाद देत नव्हते. दरम्यानच्या काळात पिंपरी चिंचवड महापालिकेचे तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांच्यासोबत चर्चा करून शहरातील अनेक ठिकाणच्या भूखंडांची पाहणी करण्यात आली होती. भूखंड निश्चित झाल्यानंतर आमदार उमा खापरे यांच्या माध्यमातून कामगार मंत्री सुरेश खाडे यांच्यासोबत मुंबईतील मंत्रायल येथे बैठक झाली.

या बैठकीत विविध मागण्यांचा प्रस्ताव ठेवण्यात आला. यामध्ये संबंधीत कामगार भवनात भव्य कामगार अनुज्ञालय स्थापन करावे. संघटीत आणि असंघटीत सेवानिवृत्त कामगारांच्या सर्व योजनांची माहिती आणि लाभाचे वाटप हे कामगार भवनातील एक खिडकी योजनेतून सुरू करा, अशी मागणी करण्यात आली. यासह इंडस्ट्रीयल इनडोर, आउटडोर स्पोर्टस निर्माण करावेत.कामगारांचे स्वतंत्र्य अद्ययावत ग्रंथालय, म्यूझीयम, अभ्यासिका सुरु करावेत. मायग्रेट कामगारांसाठी राहण्यासाठी वसतिगृत, जलतरण तलाव अशी मागणी करण्यात आली आहे.



“ महापालिकेच्या प्रभाग क्रमांक 10 मधील मोरवाडी, सम्राट चौक येथील कापसे लॉन जवळील पाच एकरचा भूखंड सर्वभूमते संमत करण्यात आला. सदरच्या भूखंडावर महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मे. वर्ग असे देखील नमूद करण्यात आले आहे. गेल्या 30 वर्षांत केलेल्या अविरत प्रयत्नांना यश मिळाले आहे. राज्य सरकार आणि कामगार मंत्रालयाकडून याबाबत कार्यवाहीला गती देण्यात आली आहे. कामगार भवनचे काम मार्गी लावण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

**-शंकर जगताप, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**



“ गेल्या अनेक वर्षापासून पिंपरी-चिंचवड शहरात भव्य कामगार भवन उभारण्यासाठी पाठपुरावा चालू आहे. या भवनाद्वारे कामगारांच्या विविध योजनांची माहिती मिळावी आणि त्याच्या लाभाचे वाटप व्हावे हा या पाठिमागील उद्देश आहे. उपमहापौर म्हणून काम करत असताना मी देखील या साठी महापालिका स्तरावर पाठपुरावा केला. काही अंशी त्याला गती मिळाली आहे. कामगार मंत्र्यांकडे पुढील पाठपुरावा सुरू असून लवकरच अद्ययावत भवन उभा राहिले अशी अपेक्षा आहे.

**-केशव घोळवे, माजी उपमहापौर, पिंपरी-चिंचवड**

# वंचित घटकांसाठी सर्वांनीच पुढाकार घेणे गरजेचे !

## उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील : पुनरुत्थान समरसता गुरुकुलम येथे दीपावली साजरी

### शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्यातर्फे दीपावली फराळाचे वाटप

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सर्वत्र दिवाळी आनंदाने आणि उत्साहाने साजरी होत असताना समाजातील निराधार, गरीब मात्र या आनंदापासून दूर राहू नयेत. या वंचित घटकांना देखील दीपावलीचा आनंद घेता यावा, यासाठी सर्वांनीच पुढाकार घेणे गरजेचे आहे, असे मत राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले.**

चिंचवड येथील पुनरुत्थान समरसता गुरुकुलम येथील गरीब आणि अनाथ मुलांसाठी आज दीपावली साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीचे अध्यक्ष पद्मश्री गिरीशजी प्रभुणे, भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप, माजी नगरसेवक राजाभाऊ बराटे, कार्यवाह सतीश गोरडे, विश्वस्त मिलिंदराव देशपांडे, कोशाध्यक्ष रवी नामदे, सदस्य आसाराम कसबे, 'डीआरडीओ'चे शास्त्रज्ञ डॉक्टर अशोक नगरकर, शिक्षण विभाग प्रमुख प्रा. दिगंबर ढोकले, अतुल आडे, योगेश चिंचवडे, अजित कुलथे, रवींद्र देशपांडे आदी उपस्थित होते.



यावेळी माजी नगरसेवक राजाभाऊ बराटे यांच्या वतीने गुरुकुलम येथील मुलांना नवीन कपड्यांचे वाटप करण्यात आले. भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या वतीने या विद्यार्थ्यांसाठी फराळाचे साहित्याचे वाटप करण्यात आले.

शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, दीपावली हा दिव्यांचा सण असून या सणामध्ये प्रत्येक जण आनंद व्यक्त करत असतो. गरीब, निराधार या मुलांना देखील आनंद व्यक्त करण्याचा अधिकार आहे. दीपावलीच्या निमित्ताने आम्ही सर्व जण आपल्यासोबत आहोत, हा विश्वास मुलामध्ये निर्माण करण्याचा हा छोटासा प्रयत्न आमच्या वतीने करण्यात आला.

**“ वंचित, निराधार मुले देखील सामाजाचा घटक आहेत. यांना देखील आपल्या प्रमाणे सण, समारंभ यांचा आनंद घ्यायचा असतो. परंतू, त्यांना त्यांच्या परिस्थितीमुळे या गोष्टींचा आनंद घेता येत नाही. यासाठीच सर्वांनीच या मुलांना मुख्य प्रवाहात समाविष्ट करून घेण्यासाठी आपल्या परीने प्रयत्न करणे गरजेचे आहे.**

**-शंकर जगताप, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**




# घसरलेल्या जिभेचे कवित्व

**महिलांचा राजकारणातील सहभाग पुरुषांची बरोबरी गाठत नाही तोवर राजकारणाला पूर्णत्व प्राप्त होत नाही हे जयप्रकाश नारायण यांचे प्रसिद्ध वाक्य. ते प्रत्यक्षात अमलात आणायचे असेल तर राजकीय नेत्यांचा महिलांविषयक दृष्टिकोन बदलणे गरजेचे. तो अजिबात बदललेला नाही हे परवा जेपींचे शिष्य म्हणवणाऱ्या नितीशकुमारांनी दाखवून दिले.**

भर सभागृहात त्यांनी महिलांविषयी अनुदार काढले व या घटनेला चांगले २४ तास उलटल्यावर माफी मागून मोकळे झाले. आता या वादावर हळूच पडदा पडेलही, पण स्वातंत्र्यप्राप्तीला ७५ वर्षे पूर्ण होऊनसुद्धा महिलांविषयी अशी हीन भावना बाळगणाऱ्या नेत्यांच्या पुरुषी मानसिकतेचे काय? ती कधी बदलणार? हेच नितीशकुमार स्वत:ला पुरोगामी विचारसरणीचे पाईक समजतात. समाजवादी पद्धतीचे राजकारण हीच आपली खरी ओळख असे सतत अभिमानाने सांगतात. बिल्कीस बानोच्या मुद्द्यावरून विरोधकांवर टीका करताना त्यांच्या शब्दाला धार चढते. मात्र त्यांच्या स्वत:च्या राजकारणाची पायाभरणी पुरोगामी विचारांवर आधारलेली नाही, हेच त्यांनी सर्वासमक्ष दाखवून दिले. कधी काळी सुशासनबाबू म्हणून नावाजल्या गेलेल्या नितीशकुमारांची अलीकडची ओळख 'पलटूराम'



अशी झाली आहे. त्यात अशा वक्तव्याची भर पडल्याने त्यांचा पाय अधिक खोलात गेला आहे. गायपट्टा अशी ओळख असलेल्या उत्तरेकडील राजकारणात सरंजामी वृत्ती कशी ठासून भरली आहे, हे याआधीही अनेकदा दिसून आले आहे. प्रामुख्याने पुरुषी वर्चस्ववादावर आधारलेली ही वृत्ती आपल्या अंगी कायम आहे हेच या मुख्यमंत्र्यांनी दाखवून दिले. आता त्यांना 'मला तसे म्हणायचे नव्हते, नकळत बोललो' ही उपरती झाली असली तरी मनात, विचारांत ठासून भरलेल्या 'पुरुषी' मानसिकतेचे काय? आयुष्याच्या उत्तरार्धातही ती तशीच राहात असेल तर आजवर उभी केलेली 'स्वप्रतिमा' भुसभुशीत विचारांवर आधारलेली होती अशी कबुली नितीशकुमार आता देतील का? यातील आणखी गंभीर बाब म्हणजे नितीशकुमार हे बोलत होते तेव्हा त्यांच्यासमवेत बसलेले सत्तारूढ दलाचे मंत्री व आमदार खिदळत होते. बिहार राज्य महिलांबाबतीत किती मागास आहे हेच दिसून आले. याच राज्यातून येणाऱ्या लालू यादवांनी कधी काळी बिहारचे रस्ते हेमामालिनीच्या गालासारखे बनवू असे म्हणत महिलांविषयीचा त्यांचा परंपरावादी दृष्टिकोन प्रकट केला होता. त्यालाही आता तीन दशके लोटली. मात्र अजूनही राज्यातील नेत्यांच्या मानसिकतेत कुठलाही बदल झालेला नाही हेच या ताज्या वक्तव्यातून दिसले. उत्तरेतील राजकारणात सक्रिय राहून अशी वक्तव्ये करणारे नितीशकुमार एकटेच नाहीत. याआधी त्यांचेच 'साथी' मुलायमसिंग यांनीसुद्धा अशी बेताल वक्तव्ये अनेकदा केली आहेत. त्यांचे एके काळचे साथीदार आझम खानसुद्धा याच माळेतले मणी. तरीही हे सारे स्वत:ला समाजवादी म्हणवून घेत असतील, पुरोगामी विचारांचे पुरस्कर्ते अशी ओळख देत असतील तर यासारखा दुसरा बेगडीपणा नाही. एकीकडे विरोधक असलेल्या भाजपला संस्कृतिरक्षक, परंपरावादी म्हणून हिणवायचे, मनुस्मृतीचा पुरस्कार करणारे अशा शब्दांत त्यांची संभावना करायची आणि दुसरीकडे स्त्रियांना दर्जाहीन ठरवणाऱ्या मनुस्मृतीप्रमाणेच बोलायचे हा दुटप्पीपणा झाला. तो नितीशकुमारांकडून तरी अपेक्षित नव्हता. राजकारण व सत्ताकारणात परिपक्वपणे वावरायचे तर समाजातील सर्व घटकांबाबत समबुद्धी असावी लागते. महिलांविषयी संवेदनशीलता बाळगावी लागते. जेपींनी संपूर्ण क्रांतीचा नारा देताना हेच उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले होते. दुर्दैवाने त्यांचेच शिष्य पाच दशकांनंतरसुद्धा या उद्दिष्टांच्या जवळपासही पोहोचले नसल्याचे या कृतीतून दिसले. यावरून विरोधकांनी व त्यातल्या त्यात भाजपने नितीश यांच्याविरुद्ध चांगलेच रान उठवले. आंदोलन केले. मात्र विरोधकांची ही कृतीसुद्धा 'निवडक नैतिकता' याच सदरात मोडणारी होती. महिलांबाबतीत आक्षेपार्ह वक्तव्ये करण्यात भाजप तरी कुठे कमी आहे? दीडशे कोटींची मैत्रीण, विधवा असे शब्दप्रयोग जाहीर सभांमधून वापरणारे सर्वोच्च नेते असोत वा जीन्स पँटवरून बेताल बडबड करणारे उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री तिरथसिंग असोत.

## संपादकीय »

# आधीच फेक

***समाजमाध्यमांत जे काही वाचू/पाहू त्याने स्वत:ची डोकी आणि भावना उद्दीपित होऊ न देणे हाच त्यातल्या त्यात या संकटास भिडण्याचा समजूतदार मार्ग आहे..***

एका दाक्षिणात्य अभिनेत्रीच्या खोट्या ध्वनिचित्रफितीची दखल घेऊन माहिती तंत्रज्ञानमंत्री राजीव चंद्रशेखर यांनी तातडीने कारवाईचे आदेश दिले, हे योग्यच! एका ब्रिटिश अभिनेत्रीच्या देहावर भारतीय अभिनेत्रीचा चेहरा बेमालूमपणे बसवल्याचे यातून पुढे आले. हे एकमेव उदाहरण नाही. व्यावसायिकांसाठीच्या एका ॲपवर ब्लूमबर्गच्या एका पत्रकाराचे प्रोफाइल बनवले गेले, जो प्रत्यक्षात अस्तित्वातच नव्हता. सेंटर फॉर स्ट्रॅटेजिक ॲण्ड इंटरनॅशनल स्टडीज असे भारदस्त नाव असलेल्या संस्थेत उच्चपदी असलेल्या एका महिलेचेही असेच प्रोफाइल केले गेले. प्रत्यक्षात अशी कोणीही महिला त्या संस्थेत नव्हती. गेल्या मार्च महिन्यात एका जर्मन कंपनीच्या ब्रिटिश उपकंपनीच्या प्रमुखास जर्मनीतून मूळ कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या दूरध्वनीवरून फोन आला आणि एका खात्यात बलदंड रक्कम भरण्यास सांगितले गेले.

**देशातील बड्या करबुडव्यांची माहिती गेल्या १४ वर्षांत कशी बदलत गेली पाहा! ऑगस्ट २००९ मध्ये केंद्रीय अर्थखात्याचे तत्कालीन राज्यमंत्री एस. एस. पलानिमनिकम यांनी राज्यसभेत माहिती दिली होती, की १०० बड्या करचुकव्यांकडे प्राप्तिकरापोटी १.४१ लाख कोटी रुपये (म्हणजेच एक कोटी ४१ हजार अब्ज रुपये) थकित आहेत.**

# गेमिंग कंपन्यांशी रडीचा डाव

या रकमेपैकी 'स्टडफार्म'चे मालक हसन अली यांच्याकडून ५० हजार ३४५ कोटी रुपये आणि दिवंगत हर्षद मेहता यांच्याकडून १२ हजार कोटी रुपये येणे होते. चार वर्षांनंतर केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी राज्यसभेत माहिती दिली की, ३१ डिसेंबर २०१२ पर्यंत प्राप्तिकराची एकूण थकबाकी ४.१८ लाख कोटी रुपये होती, ज्यापैकी हसन अलीची थकबाकी एक लाख १६ हजार ७७८ कोटी रुपये आणि हर्षद मेहताची थकबाकी १७ हजार कोटी रुपये झाली आहे. यानंतर तीन वर्षांनी 'इंडियन एक्स्प्रेस' (८ एप्रिल २०१६) मध्ये आलेली बातमी अशी की, हसन अलीकडून थकीत असलेली एकूण रक्कम फक्त तीन कोटी रुपये असल्याचा निर्णय प्राप्तिकर अपीलीय न्यायाधिकरणाने दिला आहे, कारण प्राप्तिकर विभाग आपला दावा सिद्ध करण्यात अपयशी ठरले होते. म्हणजेच, तत्कालीन अर्थमंत्र्यांनी सांगितलेली रक्कम कायद्यापुढे टिकणारी नव्हती. त्याआधी



२०१२ मध्ये, 'टू जी' घोटाळ्यावरील 'कॅग'च्या फार गवगवा झालेल्या अहवालात असा दावा करण्यात आला होता की सरकारी तिजोरीचे १.७६ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. हा आकडासुद्धा प्रत्यक्षात कधीही सिद्ध करताच आला नाही, आणि तथाकथित 'टूजी घोटाळ्या'तून सर्व आरोपी आजघडीला निर्दोष सुटले आहेत. यापैकी बहुतेकांना अनेक महिने कोठडीत- कच्च्या कैदेत काढावे लागले होते. हे आताच आठवण्याचे कारण असे, की अलीकडच्या काळात वस्तू आणि सेवा कर चुकवेगिरीवर नजर ठेवणाऱ्या 'डीजीजीआय'ने (डायरेक्टरेट-जनरल ऑफ गुड्स ॲण्ड सर्व्हिस टॅक्स इंटेलिजन्स) अनेक 'गेमिंग कंपन्यां'ना २०१७ ते २०२२ या कालावधीसाठी दीड लाख कोटी रुपयांच्या वस्तू व सेवा कर (जीएसटी) 'थकबाकी'ची मागणी करणाऱ्या कारणे दाखवा नोटिसा बजावल्या आहेत. या कंपन्यांनी जमा केलेली सर्व रक्कम 'सट्टा आणि जुगार' या सेवेसाठी आहे आणि या सेवमध्ये खर्च झालेल्या प्रत्येक रुपयावर तब्बल २८ टक्के जीएसटी आकारला जातो, हा या थकबाकीच्या आकडेमोडीचा आधार आहे. हे दावे केवळ दिशाभूल करणारे नाहीत तर कायदेशीर पाया नसलेले आहेत. 'सार्वजनिक जुगार कायदा- १८६७' मधील कलम १२ मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की 'केवळ कौशल्याचा कोणताही खेळ जुगार ठरणार नाही'. हा कायदा दीडशे वर्षांहून अधिक काळ लागू असल्यामुळे, जिथे खेळाडूच्या कौशल्याचा संबंध असतो अशा कोणत्याही खेळातली हारजीत सट्टेबाजी किंवा जुगार म्हणून मानली जाऊ शकत नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# अजित पवार शाह यांच्या भेटीला!

## » अजित दादांचा आजारपणानंतर पहिलाच दिल्ली दौरा

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पुण्यातल्या कार्यक्रमानंतर थेट दिल्ली गाठली. दिल्लीत त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. यावेळी अजित पवार यांच्यासह सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेलही होते. दिवाळीनिमित्त सदिच्छा भेट असल्याची ही माहिती आहे.**



मात्र या भेटीत राज्यातल्या परिस्थितीविषयी चर्चा झाल्याची शक्यताही आहे. या भेटीचा समोर आला आहे. महाराष्ट्रात मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे राज्यात मराठा आरक्षणाचा प्रश्न पेटला आहे. सगळ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. तसंच १५ नोव्हेंबरपासून मनोज जरांगे पाटील हे महाराष्ट्र दौराही सुरु करणार आहेत. तसंच मनोज जरांगे पाटील हे जेव्हा उपोषणाला बसले तेव्हा अजित पवार यांना डेंग्यूची लागण झाली होती. या आजारपणामुळे १५ दिवस अजित पवार सार्वजनिक कार्यक्रमात दिसले नव्हते.

त्यानंतर आज अजित पवार यांनी शरद पवार यांची भेट घेतली. त्यानंतर तातडीने दिल्लीला रवाना झाले. गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. त्यांच्यात राजकीय चर्चाही झाल्याची शक्यता आहे. अमित शाह यांच्या भेटीच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, महाराष्ट्र अध्यक्ष सुनील तटकरे हे देखील सोबत होते. मागील काही दिवसांमध्ये राज्यात राजकीय घडामोडी सुरू आहेत.

मराठा आरक्षण आंदोलन, ओबीसी आरक्षण आंदोलनाचा मुद्दा तापला आहे. राज्यात मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून महायुतीच्या सरकारमधल्या मंत्र्यांची वेगळी विधानं दिसून आली तसंच मराठा आरक्षणाच्या मुद्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे एकटेच आंदोलनाला सामोरे जात असल्याचे चित्र होते. तर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे निवडणूक प्रचारात होते. तर, अजित पवार हेदेखील आजारी होते.

### शरद पवार यांची घेतली भेट

» महाराष्ट्रात मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे राज्यात मराठा आरक्षणाचा प्रश्न पेटला आहे. सगळ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. तसंच १५ नोव्हेंबरपासून मनोज जरांगे पाटील हे महाराष्ट्र दौराही सुरु करणार आहेत. तसंच मनोज जरांगे पाटील हे जेव्हा उपोषणाला बसले तेव्हा अजित पवार यांना डेंग्यूची लागण झाली होती. या आजारपणामुळे १५ दिवस अजित पवार सार्वजनिक कार्यक्रमात दिसले नव्हते. त्यानंतर आज अजित पवार यांनी शरद पवार यांची भेट घेतली. त्यानंतर तातडीने दिल्लीला रवाना झाले. गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. त्यांच्यात राजकीय चर्चाही झाल्याची शक्यता आहे.

### निवडणूक आयोगाच्या सुनावणीकडे लक्ष

» केंद्रीय निवडणूक आयोगात नुकतीच काल महत्त्वाची सुनावणी पार पडली. या सुनावणीला स्वत: राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार उपस्थित होते. तसेच खासदार सुप्रिया सुळे या देखील उपस्थित होत्या. तर अजित पवार यांच्या गटाकडून सुनील तटकरे उपस्थित होते. अजित पवार यांची प्रकृती बरी नसल्याने ते गेल्या काही दिवसांपासून प्रसारमाध्यमांसमोरही आले नाहीत. तसेच ते कोणत्या कार्यक्रमांनाही गेले नाहीत. त्यांना डेंग्यूची लागण झाली होती. त्यांच्या शरीरातील प्लेटलेट्सचं प्रमाण घटलं होतं. त्यामुळे त्यांच्यावर उपचार सुरु होते.

अमित शाह आणि अजित पवार यांच्यात काय चर्चा झाली याचा तपशील समोर आलेला नाही. मात्र महाराष्ट्रातल्या या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वाची मानली जाते आहे.

# राहुल गांधींनी तुम्हाला हेच शिकवलं आहे का?

## » विजय वडेट्टीवारांवर मनोज जरांगे पाटील यांचा गंभीर आरोप

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**विजय वडेट्टीवार हे विरोधी पक्षनेते आहेत. विरोधी पक्षनेत्याने जनतेला न्याय द्यायचा असतो. हक्काचं न्यायमंदिर आहे, मात्र तेच (विजय वडेट्टीवार) गर्व करत आहेत. मी मराठ्यांना आरक्षण मिळू देणार नाही म्हणत आहेत असा विरोधी पक्षनेता असतो का? असा सवाल आता मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे.**

सरकारने न्याय दिला नाही तर विरोधी पक्षनेत्याकडेच जनता आशेने पाहात असते. सरकारने न्याय दिला नाही तर सगळे जण विरोधी पक्षनेत्याकडे दाद मागत असतात. राहुल गांधींनी विजय वडेट्टीवारांना हेच शिक्षण त्यांना दिलं आहे का? असा प्रश्नही मनोज जरांगेंनी उपस्थित केला आहे. विजय वडेट्टीवार यांनी काय बोलायचं? त्यांनी जनतेच्या वतीने बोललं पाहिजे.

पण त्यांना गोर-गरीब आठवत नाहीत बहुदा. ते फक्त राजकारण करत आहेत. मराठ्यांनी आता या सगळ्यांना ओळखलं आहे. आंतरवलीत म्हणाले होते ओबीसीतून मराठा आरक्षण द्या. त्यानंतर कसा रंग बदलला हे जनतेला माहीत आहे. ओबीसीत मराठ्यांनी यायचं नाही असा विरोधी पक्षनेता कुठेही नसतो.



गायकवाड आयोगही बोगस आहे हे तुमचंच म्हणणं आहे. विजय वडेट्टीवार यांची विचारधारा ही विष पेरणारी आहे असंही मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. ते राजकारणासाठी सगळं करत आहेत असंही जरांगे पाटील म्हणाले. विजय वडेट्टीवारांच्या मनात मराठ्यांबाबत माया नाही. विजय वडेट्टीवारांनी आता मराठ्यांना सल्ले द्यायचं बंद करावं असंही जरांगे म्हणाले. विजय वडेट्टीवार भाजपात जाऊ इच्छित आहेत का? त्यामुळे ते सरकारच्या बाजूने बोलत आहेत. आम्हाला कशाला तुमच्या राजकारणात ओढता? आम्ही राजकारण केलेलं नाही. मराठ्यांना मराठवाड्यात आरक्षण मिळत होतं. मात्र मी सगळ्या समाजासाठी आरक्षण द्या हे सांगितलं त्यानंतर आंदोलन राज्यभर नेलं. असंही मनोज जरांगे पाटील म्हणाले. मराठा तरुणांना कुणीही सल्ले देऊ नये. मराठा पोरांना बुद्धी आहे. मराठ्यांविषयी तुमच्या मनात किती राग आहे हे मराठ्यांच्या पोरांना माहीत आहे. तुम्ही मराठ्यांचा किती द्वेष करता हे सगळ्यांना माहीत आहे. आम्ही हिरो झालो नाही आणि मराठे हिरो समजत नाहीत. आमचं आंदोलनही तुम्हाला मिळून संपवायचं होतं. आम्ही आमच्या लेकरांच्या न्यायासाठी डोकी फुटली तरी लढायचं ठरवलं. मराठ्यांमध्ये तुम्ही हयातभर आणि तुमची पुढची पिढी संभ्रम निर्माण करु शकत नाही.

### तुम्ही कुणाला सल्ले देऊ नका

» राजकीय स्वार्थापोटी तुम्ही काही पाच सहा नेत्यांनी मराठ्यांचा कसा वापर केला हे सगळ्यांना माहीत आहे. मराठ्यांच्या पोरांना चांगलं माहीत आहे कुणाच्या मागे उभं राहायचं. मराठ्यांच्या पोरांचे मुडदे पाडले पाहिजेत असं विजय वडेट्टीवार आणि तुम्हा पाच सहा लोकांना वाटतं हे आम्हाला माहीत आहे. तुम्ही कुणाला सल्ले देऊ नका. मराठ्यांच्या मुलांना कुणाच्या मागे उभं राहायचं माहीत आहे.

# मंदिर कब बनाएंगे; तारीख नहीं बताएंगे!

## 22 जानेवारी तारीख आता जरा काँग्रेसच्या नेत्यांना सांगा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मध्यप्रदेश विधानसभेसाठी १७ नोव्हेंबरला मतदान पार पडणार आहे. सध्या भाजपाचे केंद्रीय मंत्री प्रचार करताना दिसत आहेत. केंद्रीय मंत्री स्मृती इराणी या हरदा जिल्ह्यातील खिरकिया या ठिकाणी एका सभेत बोलत होत्या. त्यावेळी त्यांनी काँग्रेसवर कडाडून टीका केली. तसंच आपल्या सासूबाईंचा आपल्याला फोन आला होता. दिवाळी येते आहे घर स्वच्छ कोण करणार असं विचारत होत्या असंही त्या म्हणाल्या. ज्यामुळे एकच हशा पिकला.**



सध्या वेळ कमी उरलाय. मी पण माझ्या घरात एकटीच सून आहे. माझ्या सासूबाईंनी मला फोन केला होता. मला म्हणाल्या मामांसाठी मतं मागते आहेस, मोदींसाठी मतं मागते आहेस पण दिवाळी तोंडावर आली आहे घराची साफसफाई कोण करणार? मी काय गांधी कुटुंबातली नाही. घरातून बाहेर पडण्याआधी आम्ही एकमेकांना विचारतो. एखाद्या पर्वाप्रमाणे असणारा दिव्यांचा उत्सव येतो आहे. प्रत्येक घरात पणत्या लागणार आहेत. मी आज सगळ्यांना सांगू इच्छिते की एक पणती राम मंदिरासाठीही आपल्या घरात तेवत ठेवा. असं स्मृती इराणी म्हणाल्या आहेत. राम मंदिरावरुन त्यांनी काँग्रेसवर टीका केली. काँग्रेसचे नेते कायम विचारायचे 'मंदिर कब बनाएंगे.. तारीख नहीं बताएंगे' तसं असेल तर तुम्ही आता त्यांना तारीख सांगा. ज्यानंतर सभेतले लोक २२ जानेवारी असं म्हणू लागले, त्यावर स्मृती इराणी म्हणाल्या आपण तर रामभक्त आहोत आपल्याला तारीख माहीत आहे. तुम्ही ही तारीख आता जरा काँग्रेसच्या नेत्यांना सांगा. स्मृती इराणी हे म्हणाल्या तेव्हा उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला. भाजपाला पूर्ण बहुमत मिळालं. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोर्टाचा निकाल काय लागतो त्याची वाट पाहिली. अत्यंत कठीण प्रसंगांतून आपण गेलो आहोत. ५०० वर्षांची प्रतीक्षा संपली आहे कारण राम मंदिर उभं राहतं आहे. आज तकने या विषयीचं वृत्त दिलं आहे. आता होणारी निवडणूक ही एखाद्या युद्धाप्रमाणेच आहे. कारण काँग्रेसने त्यांना कौरव आणि आपल्याला पांडव असं म्हटलं आहे. पण जरा आठवून पाहा महाभारताचं युद्ध झालं तेव्हा कौरवांचं काय झालं होतं? कलयुग असो की सत्ययुग धर्माचाच विजय झाला आहे आणि होईल. आपल्या ३० मिनिटांच्या भाषणात स्मृती इराणी यांनी काँग्रेसवरही जोरदार टीका केली. तसंच मध्यप्रदेशात भाजपाच्या योजना काँग्रेसने कशा बंद केल्या हे देखील सांगितलं होतं.

### 500 वर्षांची प्रतीक्षा संपली

» मी आज सगळ्यांना सांगू इच्छिते की एक पणती राम मंदिरासाठीही आपल्या घरात तेवत ठेवा. असं स्मृती इराणी म्हणाल्या आहेत. राम मंदिरावरुन त्यांनी काँग्रेसवर टीका केली. काँग्रेसचे नेते कायम विचारायचे 'मंदिर कब बनाएंगे.. तारीख नहीं बताएंगे' तसं असेल तर तुम्ही आता त्यांना तारीख सांगा. ज्यानंतर सभेतले लोक २२ जानेवारी असं म्हणू लागले, त्यावर स्मृती इराणी म्हणाल्या आपण तर रामभक्त आहोत आपल्याला तारीख माहीत आहे. तुम्ही ही तारीख आता जरा काँग्रेसच्या नेत्यांना सांगा. स्मृती इराणी हे म्हणाल्या तेव्हा उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला. भाजपाला पूर्ण बहुमत मिळालं. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोर्टाचा निकाल काय लागतो त्याची वाट पाहिली. अत्यंत कठीण प्रसंगांतून आपण गेलो आहोत. ५०० वर्षांची प्रतीक्षा संपली आहे कारण राम मंदिर उभं राहतं आहे. आज तकने या विषयीचं वृत्त दिलं आहे. आता होणारी निवडणूक ही एखाद्या युद्धाप्रमाणेच आहे. कारण काँग्रेसने त्यांना कौरव आणि आपल्याला पांडव असं म्हटलं आहे. पण जरा आठवून पाहा महाभारताचं युद्ध झालं तेव्हा कौरवांचं काय झालं होतं? कलयुग असो की सत्ययुग धर्माचाच विजय झाला आहे आणि होईल.

# मोदी दिवसातून दोनदा सूट बदलतात!

## मोदी यांच्या सूटवरून राहुल गांधींची टीका

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पेहराव नेहमीच चर्चेचा विषय असतो. ज्या प्रांतात ते जातात तेथील ते पेहराव परिधान करतात. तर, नियमित शासकीय कामांसाठीही त्यांचे ठराविक सूट असतात. दिवसभरातील विविध कार्यक्रमात ते कधीकधी वेगवेगळे कपडेही घालतात. यावरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी टीका केली आहे. ते मध्य प्रदेशातील सतना जिल्ह्यातील प्रचारादरम्यान बोलत होते.**



### मध्य प्रदेसात 17 नोव्हेंबर रोजी मतदान

» मध्य प्रदेसात १७ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. यामुळे निवडणूक प्रचाराला वेग आला आहे. मोदींच्या आणि राज्य सरकारच्या धोरणांवर टीका केली जातेय. त्यातच, राहुल गांधी यांनी मोदींच्या कपड्यांचाच मुद्दा उचलून धरला. पंतप्रधान नरेंद्र मोदी दररोज लाखो रुपयांचे सूट घालतात तर मी फक्त एक साधा पांढरा टी-शर्ट परिधान करतो, अशी टीका काँग्रेसचे राष्ट्रीय नेते राहुल गांधी यांनी केली.

मध्य प्रदेसात १७ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. यामुळे निवडणूक प्रचाराला वेग आला आहे. मोदींच्या आणि राज्य सरकारच्या धोरणांवर टीका केली जातेय. त्यातच, राहुल गांधी यांनी मोदींच्या कपड्यांचाच मुद्दा उचलून धरला. पंतप्रधान नरेंद्र मोदी दररोज लाखो रुपयांचे सूट घालतात तर मी फक्त एक साधा पांढरा टी-शर्ट परिधान करतो, अशी टीका काँग्रेसचे राष्ट्रीय नेते राहुल गांधी यांनी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी दर दिवशी निदान दोन सूट बदलतात. एकच सूट ते पुन्हा परिधान करताना तुम्ही पाहिलंय का? असा प्रश्न विचारताच जनतेमधून नाही असा प्रतिसाद आला. "मी हा एकच पांढरा शर्ट घालतो", असं राहुल गांधी म्हणाले. "राज्यात सत्तेवर आल्यानंतर मध्य प्रदेशातील ओबीसींची नेमकी संख्या जाणून घेण्यासाठी सर्वप्रथम जात जनगणना केली जाईल. ओबीसी जनगणना हे क्ष-किरणसारखे आहे. ज्यामुळे इतर मागासवर्गीयांची संख्या निश्चित होईल, त्यानुसार त्यांच्या कल्याणासाठी धोरणे आखली जातील", असंही राहुल गांधी म्हणाले.

केंद्रात काँग्रेसची सत्ता आल्यास देशव्यापी जात जनगणना केली जाईल, हा उपक्रम नागरिकांसाठी क्रांतीकारक आणि जीवन बदलणारं पाऊल ठरणार आहे, असं ते म्हणाले. तसंच, तरुण योगदान देण्यास इच्छुक आहेत, परंतु त्यांच्याकडे नोकऱ्या नाहीत, अशीही टीका त्यांनी केली.

# राज्यपाल आगीशी खेळतायत : न्यायालय

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

गेल्या काही महिन्यांपासून देशभरातील सरकारांविरोधात दाखल झालेल्या प्रकरणांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने ठाम भूमिका घेतल्याचं पाहायला मिळालं आहे. मग ते महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचं प्रकरण असो किंवा दिल्लीतील वाढत्या प्रदूषणाचा मुद्दा असो. यामुळे न्यायपालिका व कायदेमंडळ यांच्या अधिकारक्षेत्राचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर आता पुन्हा एकदा देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने पंजाबच्या राज्यपालांना परखड शब्दांत सुनावलं आहे. पंजाब सरकार विरुद्ध राज्यपाल या प्रकरणात न्यायालयाने राज्यपालांच्या कार्यपद्धतीवर कडक शब्दांत ताशेरे ओढले आहेत. प्रलंबित विधेयकांच्या मुद्द्यावरून राज्य सरकारने राज्यपाल बनवारीलाल पुरोहित यांच्याविरोधात थेट सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. या याचिकेवर सुनावणीवेळी न्यायालयाने राज्यपालांच्या कार्यपद्धतीवरून ताशेरे ओढले. "कृपया तुम्ही विधिमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकांच्या अंमलबजावणीत अडथळा आणू नका. नियमानुसार जनतेतून निवडून आलेल्या विधिमंडळाने ही विधेयकं मंजूर केली आहेत. आपण खरंच एक संसदीय लोकशाही म्हणून काम करणार आहोत का? हा एक खूप गंभीर प्रकार आहे", अशा शब्दांत न्यायालयाने बनवारीलाल पुरोहित यांना सुनावलं आहे. दरम्यान, विधेयके पारित करण्यासाठी राज्य सरकारने बोलावलेलं विधिमंडळ अधिवेशन बेकायदा होतं, असं म्हणत राज्यपालांनी काही महत्त्वाची विधेयके प्रलंबित ठेवली आहेत. त्यावरूनही न्यायालयाने राज्यपालांना खडसावलं.

# काजोल आणि करण जोहरची 25 वर्षांची मैत्री

'कॉफी विथ करण'च्या आठव्या पर्वाला २६ ऑक्टोबरपासून सुरूवात झाली आहे. यंदाच्या सीझनच्या पहिल्या भागात दीपिका-रणवीर सहभागी झाले होते, तर दुसऱ्या भागात सनी व बॉबी या देओल बंधूंनी हजेरी लावली होती. या दोन्ही भागांना मिळालेल्या भरघोस प्रतिसादानंतर तिसऱ्या भागात बॉलीवूड स्टारकिड्स सारा अली खान आणि अनन्या पांडे या दोघी सहभागी झाल्या होत्या. त्यांच्याशी संवाद साधताना करणने वैयक्तिक जीवनातील अनेक गोष्टींबाबत खुलासा केला. करण जोहरचं वैयक्तिक आयुष्यात अभिनेत्री काजोलबरोबर जोरदार भांडण झालं होतं. या भांडणामुळे दोघेही एकमेकांशी जवळपास २ वर्ष बोलत नव्हते. काजोल-करणच्या २५ वर्षांच्या मैत्रीत अचानक कोणामुळे दुरावा आला. याबद्दल त्याने सारा अली खान आणि अनन्या पांडे यांना सांगितलं. तसेच करणने हा किस्सा त्याच्या “अँन अनसुटेबल बॉय” या





बायोग्राफित सुद्धा लिहिला आहे. अभिनेत्री काजोल आणि करण जोहर यांच्या जवळपास २५ वर्ष घट्ट मैत्री होती. दोघांनी ‘कभी खुशी कभी गम’, ‘कुछ कुछ होता है’ या गाजलेल्या चित्रपटांसाठी एकत्र काम केलं होतं. परंतु, २०१६ प्रदर्शित होणाऱ्या अजय देवगणच्या ‘शिवाय’ चित्रपटामुळे करण आणि काजोलचं भांडण झालं. अजय देवगण प्रमुख भूमिकेत असलेला ‘शिवाय’ आणि करण जोहर दिग्दर्शित ‘ये दिल है मुश्किल’ हा चित्रपट २८ ऑक्टोबर २०१६ रोजी एकाच दिवशी प्रदर्शित झाले होते. ‘ये दिल है मुश्किल’ हा चित्रपट शिवायबरोबर क्लॅश झाल्याने काजोल करणवर प्रचंड नाराज झाली होती. त्यांची २५ वर्षांची मैत्री एका क्षणात तुटली अन् पुढची दोन वर्ष तिने करणबरोबर जराही संवाद साधला नव्हता. करण जोहर पुढे सारा-अनन्याला म्हणाला, “माझी मुलं यश आणि रुहीचा जन्म झाल्यावर मी स्वतःहून काजोलला मेसेज केला होता. तिला दोघांचे सगळे फोटो पाठवले. ही माझी मुलं आहेत...तुझी इच्छा असल्यास मला जरूर रिप्लाय दे असं मी त्या मेसेजमध्ये लिहिलं होतं. यानंतर काजोलने समोरून मी तुझ्यासाठी प्रचंड आनंदी आहे... असं उत्तर मला दिलं होतं.

## ईशान खट्टरचा जबरदस्त अभिनय

चित्रपटाची कथा ही पिप्पा नावाच्या टँकची आहे, जो पाण्यावर चालणारा भारताचा पहिला टँक होता. या टँकने 1971 च्या भारत-पाकिस्तान युद्धात शत्रूची अवस्था बिकट केली होती. टँकच्या नावावरुन चित्रपटाचे नाव देण्यात आले आहे, हे आश्चर्यकारक आहे. ईशान खट्टर, मृणाल ठाकूर आणि प्रियांशू पैन्युली हे चित्रपटात भाऊ-बहीण दाखवण्यात आले आहेत. त्यांचे वडील सैन्यात होते आणि ते शहीद झाले आहेत. जेव्हा ईशान खट्टर म्हणजेच ब्रिगेडियर बलराम मेहता यांना पिप्पा टँकची चाचणी करण्यास सांगितले जाते तेव्हा तो आपल्या अधिकाऱ्याच्या आदेशाचे उल्लंघन करतो आणि टँक खोलवर नेतो. बलराम मेहता यांना त्यांचे कुटुंबीय कमी लेखत असतात. बलराम यांचा मोठा भाऊ युद्धाला जातो. तसेच त्यांच्या बहिणीला कोडिंग येत असते त्यामुळे ती देखील सैन्यात भरती होते पण नंतर बलराम यांना आपली क्षमता सिद्ध करायची असते. तीन लोकांच्या बसण्याची क्षमता असलेल्या टँकीचे रूपांतर चार लोकांच्या बसण्याच्या जागेत ते करतात. हे पाहून लष्करप्रमुख सॅम माणेकशॉ हे त्यांना युद्धावर पाठवतात. मग एक युद्ध होते आणि काय होते हे आपल्या सर्वांना माहित आहे परंतु ही कथा ज्या प्रकारे दाखवण्यात आली आहे ते विलक्षण आहे.

## आदित्य व अनन्याच्या डेटिंगच्या चर्चा



अनन्या पांडे आणि आदित्य रॉय कपूर हे मागच्या काही काळापासून एकमेकांना डेट करत आहेत, पण दोघांनी आतापर्यंत जाहीरपणे त्यांच्या नात्याची कबुली दिलेली नाही. अशातच अनन्या आणि सारा अली खान यांनी नुकतीच ‘कॉफी विथ करण’मध्ये हजेरी लावली. यावेळी करणने अनन्याला तिच्या रिलेशनशिप स्टेटसबद्दल विचारलं. यावर अनन्याने नात्याबद्दल स्पष्ट भाष्य केलं नाही, पण ती आदित्यबरोबर आहे असे सूचक इशारे देणारे विधान केले. यासाठी तिने आदित्यच्या चित्रपटाचं नाव घेतलं. करणने अनन्याला विचारलं की “तू कधी प्रेमात ‘गुमराह’ (हरवली) आहेस का?” इथे करणने उल्लेख केलेला ‘गुमराह’ शब्द आदित्य रॉय कपूरशी संबंधित आहे. कारण हे त्याच्या चित्रपटाचं नाव आहे. करणला उत्तर देताना अनन्या म्हणाली, “आशिकी अशीच होते.” दरम्यान, ‘आशिकी २’ या चित्रपटात आदित्य रॉय कपूरची मुख्य भूमिका होती. १० वर्षांपूर्वी आलेल्या या चित्रपटाने आदित्यला प्रचंड लोकप्रियता मिळवून दिली. पुढे ती म्हणाली, “काही गोष्टी खासगी आणि खास आहेत आणि त्या तशाच ठेवल्या पाहिजेत. परंतु मला खरोखर माझ्या व्यावसायिक जीवनाबद्दल बोलायचे आहे कारण कोणीही याबद्दल बोलत नाही.” जेव्हा करणने पुन्हा अनन्याकडून उत्तर मिळविण्यासाठी तिला आदित्यबद्दल विचारलं तेव्हा ती म्हणाली की “आम्ही फक्त चांगले मित्र आहोत.” याच एपिसोडमध्ये जेव्हा सारानेही अनन्या व आदित्यच्या नात्याबद्दल त्याच्या ‘द नाइट मॅनेजर’ सीरिजचा उल्लेख करत इशारा दिला. शिवाय यापूर्वी अनेकदा आदित्य व अनन्या एकमेकांबरोबर परदेशात फिरायला जाताना दिसले आहेत. दोघेही अनेक महिन्यांपासून डेट करत आहेत, फक्त त्यांनी नातं अधिकृत केलेलं नाही.

## आदिती कोटक कुटुंबाची सून झाली



माजी मिस इंडिया आदिती आर्या (ADITI ARYA) ही लग्नबंधनात अडकली आहे. आदिती आर्यानं जय कोटकसोबत (JAY KOTAK) लग्नगाठ बांधली आहे. आदिती आणि जय यांच्या लग्नसोहळ्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. मुंबईतील (MUMBAI) जिओ कन्व्हेन्शन सेंटरमध्ये (JIO CONVENTION CENTRE) आदिती आणि जय यांचा विवाह सोहळा पार पडला. जाणून घेऊयात आदितीचा पती जय कोटक याच्याबद्दल... आदितीचा पती जय कोटक हा बँकिंग टायकून उदय कोटक (UDAY KOTAK) यांचा मुलगा आहे. सध्या तो कोटक 811 चा सह-हेड आहे. MCKINSEY आणि GOLDMAN SACHS सह, जय 2019 मध्ये कोटक महिंद्रा बँकेच्या ग्राहक बँकिंग व्यवसायात सामील झाला. नंतर, स्ट्रॅटर्जी आणि उत्पादन विकासावर देखरेख करत 2021 मध्ये कोटक 811 संघाचे नेतृत्व जयने केले. जय हा हार्वर्ड बिझनेस स्कूलमधून एमबीए पदवीधर झाला. त्यानंतर त्याने कोलंबिया विद्यापीठातून इतिहासात बी.ए. केले आहे. गुरुग्रामची राहणारी अदिती ही 2015 मध्ये फेमिना मिस इंडिया ही स्पर्धा जिंकली होती. तसेच तिने चीनमध्ये पार पडलेल्या मिस वर्ल्ड 2015 या स्पर्धेमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले होते. आदितीने 2021 मध्ये ‘83’ या चित्रपटाच्या माध्यमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले.

# 'एक अशा प्रवासाची गोष्ट, ज्याने शिकवले जीवन जगण्याचे सूत्र!

आजवर मराठीत नेहमीच हटके आणि नवनवीन विषयांना हात घालणारे चित्रपट बनत आले आहेत. कोकोनट मोशन पिक्चर्स मराठी रसिक प्रेक्षकांसाठी एक हृदयस्पर्शी कलाकृती घेऊन येत आहेत. नुकताच त्यांच्या आगामी 'ओले आले' (OLE AALE) या चित्रपटाचे मोशन पोस्टर प्रदर्शित झाले. त्यात नाना पाटेकर (NANA PATEKAR), सिद्धार्थ चांदेकर (SIDDHARTH CHANDEKAR) आणि सायली संजीव (SAYALI SANJEEV) झळकत आहेत आणि ते रिव्हर राफ्टिंगचा आनंद घेताना दिसत आहेत. या चित्रपटात मकरंद अनासपुरे (MAKARAND ANASPURE) हे देखील महत्त्वाची भूमिका साकारणार आहेत. कोकोनट मोशन पिक्चर्स प्रस्तुत 'ओले आले' चित्रपटाच्या मोशन पोस्टरसोबत कॅप्शनमध्ये लिहिलेली 'एक



अशा प्रवासाची गोष्ट, ज्याने शिकवले जीवन जगण्याचे सूत्र!' ही ओळ आणखी कुतूहल निर्माण करणारी आहे. हे त्रिकुट कुठे चालले आहे? या प्रवासाचं नेमकं प्रयोजन काय बरं असेल? असे बरेच प्रश्न उत्सुकता निर्माण करत आहेत. रश्मिन मजीठिया निर्मित, या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रसिद्ध लेखक-दिग्दर्शक विपुल मेहता यांनी केले आहे. “मराठी सिनेरसिकांची आवड निवड लक्षात घेऊन आम्ही 'ओले आले' हा चित्रपट बनवला आहे. यात जी प्रवासाची धम्माल गोष्ट आहे, ती प्रत्येकाला नक्कीच जवळची वाटेल. ही सहल प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन करणारी असेल”, असा विश्वास कोकोनट मोशन पिक्चर्सचे संस्थापक रश्मिन मजीठिया यांनी व्यक्त केला. 'ओले आले' चित्रपटाच्या माध्यमातून बॉलिवूडमधील सुप्रसिद्ध संगीतकार जोडी सचिन-जिगर मराठीत पदार्पण करत आहेत.

# द.आफ्रिकेचा 5 गडी राखून विजय

## » रॅसी व्हॅन डर डुसेनने झळकावले नाबाद अर्धशतक

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर शुक्रवारी एकदिवसीय विश्वचषक २०२३ या स्पर्धेतील ४२वा सामना खेळला गेला. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेन अफगाणिस्तानचा ५ गडी राखून पराभव केला. अफगाणिस्तानने सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तान संघाने ५० षटकांत सर्वबाद २४४ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेने रॅस्सी व्हॅन डर डुसेनच्या नाबाद अर्धशतकाच्या जोरावर ४७.३ षटकांत ५ गडी राखून विजय नोंदवला.**




दक्षिण आफ्रिकेने शेवटच्या साखळी सामन्यात अफगाणिस्तानचा पाच गडी राखून पराभव केला. या पराभवासह अफगाणिस्तानचा वनडे विश्वचषक २०२३ मधील प्रवास संपला. मात्र, अफगाणिस्तान संघाने या स्पर्धेत चमकदार खेळ केला. या सामन्यातही अफगाणिस्तानचा संघ संघर्षानंतर पराभूत झाला. दक्षिण आफ्रिका संघाकडून रॅसी व्हॅन डर डुसेनने नाबाद अर्धशतक झळकावले. त्याने ९५ चेंडूंत ६ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने ७६ धावांची खेळी खेळली. अफगाणिस्तानकडून राशिद आणि नबीने २-२ विकेट्स घेतल्या. तत्पूर्वी अफगाणिस्तान संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना अजमतुल्ला उमरझाईच्या नाबाद ९७ धावांच्या खेळीच्या जोरावर ५० षटकांत सर्वबाद २४४ धावा केल्या होत्या. अजमतुल्ला उमरझाईने १०७ चेंडूत नाबाद ९७ धावा केल्या. या खेळीत त्याने सात चौकार आणि तीन षटकार मारले. रहमत शाह आणि नूर अहमद यांनी प्रत्येकी २६ धावांचे योगदान दिले. रहमानउल्ला गुरबाजने २५ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून गोलंदाजी करताना जेराल्ड कोएत्झीने सर्वाधिक चार विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर लुंगी एनगिडी आणि केशव महाराज यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. फेहलुकवायोने एक विकेट घेतली. दक्षिण आफ्रिकेचा संघ आधीच उपांत्य फेरीत पोहोचला आहे. मात्र, गेल्या सामन्यात भारताविरुद्ध दारुण पराभवाला सामोरे जावे लागले. अशा परिस्थितीत हा संघ पुन्हा विजयी मार्गावर परतला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे लक्ष्याचा पाठलाग करताना आफ्रिकेने विजय मिळवला आहे. उपांत्य फेरी गाठण्यासाठी अफगाणिस्तानला हा सामना ४३८ धावांनी जिंकावा लागणार होता. अशा स्थितीत हा संघ आधीच उपांत्य फेरीच्या शर्यतीतून बाहेर पडला होता. 245 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेच्या संघाची सुरुवात चांगली झाली. क्विंटन डी कॉकने झटपट धावा केल्या. त्याला कर्णधार टेंबा बावुमाने चांगली साथ मिळाली. संघाने 10 षटकात बिनबाद 57 धावा केल्या. मात्र, यानंतर द. आफ्रिकेचे फलंदाज थोडे फसताना दिसले. बावुमा (23), डी कॉक (41), एडन मार्कराम (25) आणि हेनरिक क्लासेन (10) लवकर बाद झाले. 5व्या विकेटसाठी डेव्हिड मिलर (24) आणि ड्युसेन यांनी 58 चेंडूत 43 धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली.

### अफगाणिस्तानची भेदक गोलंदाजी

» द. आफ्रिकेच्या वतीने, ड्युसेनने अत्यंत लढाऊ अर्धशतकी खेळी खेळून संघाला केवळ सामन्यात रोखलेच नाही तर विजयाकडे नेले. शानदार फलंदाजी करत त्याने आपल्या एकदिवसीय कारकिर्दीतील 14वे अर्धशतक आणि या विश्वचषकातील दुसरे अर्धशतक पूर्ण केले. 107 चेंडूत 97 धावा केल्यानंतर तो नाबाद राहिला. यादरम्यान त्याने 90.65 च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी केली आणि 7 चौकार आणि 3 शानदार षटकारही मारले. मोहम्मद नबीने 10 षटकात 35 धावा देऊन 2 बळी घेतले आणि राशिद खानने 10 षटकात 37 धावा देत 2 बळी घेतले. या दोघांनी केवळ विकेट घेतल्या नाहीत तर प्रोटीज संघाला सहज धावाही करू दिल्या नाहीत. त्यांच्याशिवाय मुजीब-उर-रहमानने 1 बळी घेतला, तर नवीन-उल-हक आणि नूर अहमद यांनी किफायतशीर गोलंदाजी करूनही त्यांना एकही बळी मिळवता आला नाही.

# सरकारचा हस्तक्षेप श्रीलंका क्रिकेट संघाच्या अंगलट!

## » आयसीसीने तात्काळ प्रभावाने क्रिकेट बोर्डाचे सदस्यत्व केले निलंबित

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**एकदिवसीय विश्वचषक २०२३ दरम्यान श्रीलंकेच्या क्रिकेट संघाला मोठा धक्का बसला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) श्रीलंका क्रिकेट बोर्डाचे आयसीसी सदस्यत्व तात्काळ प्रभावाने निलंबित केले आहे. आयसीसी बोर्डाची शुक्रवारी बैठक झाली आणि निर्णय घेतला की श्रीलंका क्रिकेट एक सदस्य म्हणून आपल्या दायित्वांचे गंभीर उल्लंघन करत आहे. तथापि, निलंबनाच्या अटी आयसीसी बोर्ड योग्य वेळी ठरवेल. याबाबत आयसीसीने एका प्रसिद्धीपत्रकात माहिती दिली आहे.**




आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या म्हणण्यानुसार, श्रीलंका क्रिकेट बोर्डात सरकारी हस्तक्षेप खूप होता आणि त्यामुळेच असा निर्णय घेण्यात आला. एकदिवसीय विश्वचषक २०२३ मध्ये श्रीलंकेचा संघ शेवटचा साखळी खेळला गेल्याच्या एका दिवसानंतर श्रीलंका क्रिकेट बोर्डाचे निलंबन झाले. एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत या संघाची कामगिरी अत्यंत खराब होती आणि या संघाने ९ पैकी केवळ २ सामने जिंकले होते. त्याचबरोबर ७ सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला होता. आयसीसीने जारी केलेल्या एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, "आयसीसी बोर्डाची शुक्रवारी बैठक झाली. या बैठकीत निर्णय घेतला की श्रीलंका क्रिकेट एक सदस्य म्हणून आपल्या दायित्वांचे गंभीर उल्लंघन करत आहे. विशेषत: त्यांचे व्यवहार स्वायत्तपणे व्यवस्थापित करण्याची आवश्यकता आहे. तसेच प्रशासनात कोणताही सरकारी हस्तक्षेप नाही, याची याची खात्री करणे आवश्यक आहे. निलंबनाच्या अटी आयसीसी बोर्ड योग्य वेळी निश्चित करतील. श्रीलंकन क्रिकेटच्या परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी आयसीसीने शुक्रवारी ऑनलाइन बैठक घेतली. असे कळते की आयसीसी बोर्डाला एसएलसीमधील प्रशासनापासून ते वित्त आणि अगदी राष्ट्रीय संघाशी संबंधित बाबींमध्ये श्रीलंका सरकारच्या हस्तक्षेपाची चिंता होती. आयसीसीने एसएलसीला आपल्या निर्णयाची माहिती दिली आहे. त्यांना सांगितले आहे.

### आयसीसीने काय म्हटले?

» गुरुवारी संसदेत सरकार आणि विरोधी पक्षांच्या संयुक्त ठरावात एसएलसी व्यवस्थापनाच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली होती. यानंतर "श्रीलंका क्रिकेटचे आयसीसीचे सदस्यत्व तात्काळ निलंबित करण्यात आले आहे," असे आयसीसीने एका निवेदनात म्हटले आहे. आयसीसीने श्रीलंका क्रिकेट संघाचे निलंबन करताना सांगितले की श्रीलंका क्रिकेट एक सदस्य म्हणून आपल्या जबाबदाऱ्यांचे गंभीर उल्लंघन करत आहे. विशेषतः व्यवहार स्वायत्तपणे व्यवस्थापित करण्याची आणि शासन, प्रशासनात कोणताही सरकारी हस्तक्षेप नाही, याची खात्री करणे आवश्यक आहे.